# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

( पूर्वीचे पुणे विद्यापीठ )

**परिपत्रक क्र. २१५/२०२२**

दिनांक १२ मार्च, २०२१ पासून स्वातंत्र्याच्या ७५ व्या वर्षानिमित्त "आजादी का अमृत महोत्सव" या केंद्र शासनाच्या योजनेअंतर्गत राज्यात विविध कार्यक्रमांच्या आयोजनास सुरुवात झाली. त्याअनुषंगाने दिनांक ११ ऑगस्ट, २०२१ रोजी मा.मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली "आजादी का अमृत महोत्सव" अर्थात "स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव" या कार्यक्रमाचे आयोजनाबाबत विविध मंत्रालयीन अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव यांच्या समवेत बैठक संपन्न झाली. सदर बैठकीत हा महोत्सव देशाच्या स्वातंत्र्याच्या ७५ व्या वर्षानिमित्त केंद्र शासनाने सुचित केल्यानुसार १५ ऑगस्ट, २०२२ पर्यंतच्या ७५ आठवड्यात ७५ कार्यक्रमाचे आयोजन राज्यभर जनसामान्यांना सामावून घेऊन करण्याबाबत सुचित करण्यात आले. सदर कार्यक्रमाचा प्रसार व प्रचार जास्तीत जास्त माध्यमांचा वापर करुन करण्याचा शासनाचा मानस आहे. त्या अनुषंगाने "आजादी का अमृत महोत्सव" अर्थात "स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव" या योजनेतंर्गत शासनाच्या सर्व शासकीय पत्रव्यवहार तसेच इतर ठिकाणी / विविध माध्यमांवर परिशिष्ट "अ" मध्ये सुनिश्चित केलेल्या चिन्हाचा (Logo) वापर करण्यात यावा. सदर चिन्हाचा (Logo) शासकीय पत्रव्यवहारासाठी कटाक्षाने वापर करणे तसेच कार्यालयांमध्ये दर्शनी भागात बॅनर प्रदर्शित करण्याबाबत महाराष्ट्र शासन, पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, शासन निर्णय क्र.: संकीर्ण-८२२१/प्र.क्र.१७७/सां.का.४, दिनांक ३० सप्टेंबर, २०२१ रोजी निर्देश दिलेले आहेत. (सोबत शासन परिपत्रक जोडत आहे.) सदर शासन परिपत्रकामधील आशय स्वयंस्पष्ट आहे.

सदर शासन निर्णयास अनुसरुन सर्व संबंधितांना कळविण्यात येते की, उपरोक्त शासन निर्णयामधील परिशिष्ट "अ" मध्ये सुनिश्चित केलेल्या चिन्हाचा (Logo) पत्रव्यवहारात वापर तसेच शासन निर्णयामध्ये नमूद केल्याप्रमाणे इतर आवश्यक कार्यवाही करण्यात यावी.

**सोबत :- महाराष्ट्र शासन, पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, शासन निर्णय क्र.: संकीर्ण-८२२१/ प्र.क्र.१७७/सां.का.४, दिनांक ३० सप्टेंबर, २०२१.**

गणेशखिंड, पुणे – ४११ ००७ )
जावक क्र. एएन/3292 )
दिनांक : 30 JUL 2022 )

**(डॉ.प्रफुल्ल पवार)**
**कुलसचिव**

**प्रत माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी :-**

१. सर्व विभागप्रमुख, शैक्षणिक विभाग
२. सर्व शाखाप्रमुख, प्रशासकीय विभाग
३. मा.प्राचार्य, विद्यापीठाशी संलग्न सर्व महाविद्यालये
४. मा.संचालक, विद्यापीठाच्या मान्यताप्राप्त सर्व संस्था

} सदर परिपत्रकातील आशय आपल्या विभागातील सर्व संबंधित शिक्षक, शिक्षकेतर अधिकारी/कर्मचारी व विद्यार्थ्यांच्या निदर्शनास आणून द्यावा, ही विनंती.

D:\2022\Circular 2022\Circular - Govt LOGO.docx

"स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव" या कार्यक्रमांतर्गत
शासकीय पत्रव्यवहारावर चिन्ह वापरण्याबाबत

महाराष्ट्र शासन
पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग,
शासन निर्णय क्र. संकीर्ण ८२२१/प्र.क्र. १७७ /सां.का.४
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
दिनांक : ३० सप्टेंबर, २०२१

**वाचा** :- १) संस्कृति मंत्रालय, भारत सरकार यांचे दिनांक २७ फेब्रुवारी, २०२१ रोजीचे पत्र
२) सूचना व प्रसारण मंत्रालय, भारत सरकार यांचे दिनांक ३ मार्च, २०२१ रोजीचे पत्र

**प्रस्तावना :-**

उपर्निर्दिष्ट क्र. १ व २ अन्वये, प्राप्त झालेल्या पत्रांच्या अनुषंगाने दिनांक १२ मार्च, २०२१ पासून स्वातंत्र्याच्या ७५ व्या वर्षानिमित्त "आजादी का अमृत महोत्सव" या केंद्र शासनाच्या योजनेअंतर्गत राज्यात विविध कार्यक्रमांच्या आयोजनास सुरुवात झाली. त्याअनुषंगाने, दिनांक ११ ऑगस्ट, २०२१ रोजी मा. मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली "आजादी का अमृत महोत्सव" अर्थात "स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव" या कार्यक्रमाचे आयोजनाबाबत विविध मंत्रालयीन अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव यांच्या समवेत बैठक संपन्न झाली. सदर बैठकीत हा महोत्सव देशाच्या स्वातंत्र्याच्या ७५ व्या वर्षानिमित्त केंद्र शासनाने सुचित केल्यानुसार १५ ऑगस्ट, २०२२ पर्यंतच्या ७५ आठवडयात ७५ कार्यक्रमाचे आयोजन राज्यभर जनसामान्यांना सामावून घेऊन करण्याबाबत सुचित करण्यात आले. सदर कार्यक्रमाचा प्रसार व प्रचार जास्तीत-जास्त माध्यमांचा वापर करुन करण्याचा शासनाचा मानस असून त्यानुषंगाने शासकीय पत्रव्यवहार तसेच इतर ठिकाणी विविध माध्यमांवर सुनिश्चित चिन्हाचा (Logo) वापर करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-**

"आजादी का अमृत महोत्सव" अर्थात "स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव" या योजनेंतर्गत शासनाच्या सर्व शासकीय पत्रव्यवहार तसेच इतर ठिकाणी / विविध माध्यमांवर परिशिष्ट - "अ" मध्ये सुनिश्चित केलेल्या चिन्हाचा (Logo) वापर करण्यात यावा.

२. सदर चिन्हाचा (Logo) शासकीय पत्रव्यवहारासाठी वापर करण्याचे कटाक्षाने पालन करावे. तसेच, सर्व शासकीय कार्यालयांमध्ये दर्शनी भागात बॅनर प्रदर्शित करण्यात यावेत. सर्व मंत्रालयीन / प्रशासकीय विभागांनी त्यांच्या अधिनस्त क्षेत्रीय

कार्यालयांना सदर बाब निदर्शनास आणून त्याप्रमाणे कार्यवाही करण्याबाबत योग्य त्या सूचना प्रसारीत कराव्यात.

३.  सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक २०२१०९३०१७३२०१६६२२ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

(विलास रा. थोरात)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा. राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई
२. मा. सभापती, विधान परिषद, विधान मंडळ, मुंबई
३. मा. अध्यक्ष, विधानसभा, विधान मंडळ, मुंबई
४. मा. मुख्यमंत्री यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
५. मा. उपमुख्यमंत्री यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
६. मा. मंत्री, सांस्कृतिक कार्य यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
७. सर्व मा. मंत्री / मा. राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
८. मा. राज्यमंत्री, सांस्कृतिक कार्य यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
९. मा. विरोधी पक्ष नेता, विधान परिषद / विधान सभा यांचे सचिव
१०. सर्व विधान मंडळ सदस्य
११. सचिव, विधानसभा / विधान परिषद यांचे स्वीय सहाय्यक
१२. सर्व अपर मुख्य सचिव / मा. प्रधान सचिव / मा. सचिव यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
१३. सर्व विभागीय आयुक्त / सर्व जिल्हाधिकारी /मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद / आयुक्त, महानगर पालिका / मुख्याधिकारी, नगर पालिका
१४. सर्व क्षेत्रीय कार्यालय (मंत्रालयीन प्रशासकीय विभागामार्फत)
१५. सचिव (सांस्कृतिक कार्य), पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
१६. उप सचिव (सांस्कृतिक कार्य), पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
१७. संचालक, सांस्कृतिक कार्य संचालनालय, मुंबई ४०० ०३२
१८. अवर सचिव, अर्थसंकल्प शाखा, पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग
१९. निवड नस्ती, सां.का.४

शासन निर्णय क्र. संकीर्ण ८२२१/प्र.क्र. १७७/सां.का.४, दि. ३० सप्टेंबर, २०२१
सोबतचे "परिशिष्ट - अ"

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव